कार्यालयीन परिपत्रक क्र. : ३२

पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.
दिनांक : १९/१०/२०२४.

विषय : असिस्टंट बाईंडर या १ पदांसाठी खातेअंतर्गत अर्ज.

संदर्भ : १) सन २०१३ चा मंजूर आस्थापना आराखडा ठराव क्र.४८, दि. ०२/०८/२०१३.
२) मा. संचालक मंडळ ठराव क्र. ०६, दि. १७/११/२०१८.
३) ॲडमिन विभागाकडील दि. २६/०६/२०२४ रोजीची मान्य बढती साखळी.
४) मा. सहव्यवस्थापकीय संचालक यांचे दालनात दि. २७/०६/२०२४ रोजी झालेल्या बैठकीचा वृत्तांत व मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे दि. ०५/०९/२०२४ रोजीचे आदेश / निर्देश.

परिवहन महामंडळाचे जनरल ॲडमिन विभागाकडील मान्य बढती साखळीचे अनुषंगाने असिस्टंट बाईंडर हे पद खातेअंतर्गत अर्ज मागवून भरणेबाबत संदर्भ क्र. ४ ने आदेशित करणेत आले आहे.

जनरल ॲडमिन विभागाकडील मान्य बढती साखळीनुसार असिस्टंट बाईंडर या पदाची वेतनश्रेणी १८०००-५६९०० (एस-५) अशी असून सदरचे पद ॲडमिन, वाहतुक, वर्कशॉप विभागातील कायम कर्मचाऱ्यांकडून खातेअंतर्गत अर्ज मागवून भरणेकामी खालीलप्रमाणे अर्हता निश्चित करणेत आली

१. दि. १/८/२०१४ नंतर सेवेत दाखल झालेल्या कर्मचाऱ्यांना १० वी पास, शासन मान्य संस्थेचा बायडींग कोर्स पास, बायडींग कामाचा ५ वर्षाचा अनुभव, सेवाजेष्ठता, हजेरी व सर्व्हिस रेकॉर्ड समाधानकारक.
२. दि. ३१/७/२०१४ रोजी किंवा तत्पूर्वी सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांना बायडींग कामाचा अनुभव व शैक्षणिक पात्रता ८ वी पास इतकी शिथिल, सेवाजेष्ठता, हजेरी व सर्व्हिस रेकॉर्ड समाधानकारक.
३. बायडींग कामाची ट्रेड टेस्ट पास होणे आवश्यक.

उपरोक्त नमूद अटी शर्तीनुसार जे कर्मचारी असिस्टंट बाईंडर या पदासाठी पात्र असतील, अशा कर्मचाऱ्यांनी त्यांचे लेखी अर्ज कागदपत्रांसह महामंडळाच्या मुख्य इमारतीतील बारनिशी विभागात दि.२२/१०/२०२४ अखेर पर्यत सादर करावेत. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

अर्ज सादर करणेसाठी सर्व साधारण अटी शर्ती खालीलप्रमाणे.

१. असिस्टंट बाईंडर या १ पदासाठी अर्ज करणेस वाहतुक, ॲडमिन व वर्कशॉप विभागातील कर्मचारी पात्र राहतील. अपूर्ण व कागदपत्रांची पुर्तता नसलेला अर्ज सादर करू नये, सादर केल्यास अशा अर्जांचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.
२. विभागीय बढती समिती मार्फत निवड.
३. पात्र अर्जदारांची परिक्षा व मुलाखत घेणेबाबतचा सर्वस्वी निर्णय मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचा राहील.
४. या परिपत्रकाद्वारे नेमणूक करणे महामंडळावर बंधनकारक नाही.
५. दिव्यांग व अनुकंपा कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्जात दिव्यांग /अनुकंपा असलेबाबतचा उल्लेख करावा. तसेच दिव्यांग कर्मचाऱ्यांनी दिव्यांगत्वाचा दाखल अर्जासोबत सहपत्रित करावा.
६. विभागीय बढती समितीची शिफारस व असिस्टंट बाईंडर या पदासाठी महामंडळाचे आवश्यकतेनुसार नेमणूका करणेबाबत अंतिम निर्णय घेण्याचे सर्व अधिकार मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांना राहतील.

७. अर्जदार कर्मचाऱ्यांनी रू. २००/- पेटी कॅश विभागात भरून त्याबाबतची पावती अर्जा सोबत जोडणे आवश्यक आहे. भरणा पावती न जोडलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत. तसेच काही कारणास्तव जाहिरात रद्द केल्यास महामंडळाकडून सदरची रक्कम परत दिली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**(मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे मान्यतेने)**

(नितीन नार्वेकर)
सहव्यवस्थापकीय संचालक
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.